म.पा.पु.व ज.नि.मंडळ, आ-4.

1994/10/29.

विषय : दिनांक 20.10.94 (गुरुवार) रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त.

महा. पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 64 वी सभा गुरुवार दिनांक 20.10.94 रोजी मा.मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष यांचे दालनांत सकाळी 11.00 वाजता घेण्यांत आली. अध्यक्षस्थानी मा.श्री. अरुण गुजराथी, मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष होते.

सभेस महा. पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1) मा.श्री. अरुण गुजराथी, अध्यक्ष,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ, व
मा.मंत्री, नगर विकास, मंत्रालय, मुंबई 32.

2) मा.श्री.शिवाजीराव पंडीत, उपाध्यक्ष
म.पा.पु.व ज.नि.मंडळ, व
मा.राज्यमंत्री, ग्राम विकास, मंत्रालय, मुंबई 32.

3) श्री.डी.टी. जोसेफ,
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

4) श्री. सुरेश कुमार,
सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

5) श्री.श्री.ब. गांगुर्डे,
उपसचिव, खर्च,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32.

6) श्री.जगन्नाथ शिवलींग पाटील, सदस्य,
जिल्हा परिषद, सोलापूर,जि. सोलापूर.

7) श्री.प्रभाकर मणचेकर, सदस्य
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

8) श्री. गणेश रॉय, सदस्य,
अध्यक्ष, चांदूररेल्वे, जिल्हा अमरावती.

9) श्री.एम. आर. अगरवाल, सदस्य,
ऐ-1/5, क्लारसेन सोसायटी, कोरेगांव पार्क, पुणे.

10) श्री.एम.के. गोखले, सदस्य,
नृसिंहधाम, विष्णुनगर, नौपाडा, ठाणे.

11) श्री. राजेंद्र सगणे, सदस्य सचिव,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ, मुंबई 21.

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली.

महा.पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. श्री.एस.डी. अरमाळ, मुख्य अभियंता - प्रकल्प.
2. श्री. ए.ए. संकपाळ, मुख्य अभियंता - ग्रामीण.
3. श्री. डी.के. भसाळे, मुख्य अभियंता - नागरी.
4. श्री. ज.बा. अंत्रिगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
5. श्री.एम.आर. कुलकर्णी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

मंडळाचे अध्यक्ष व मंत्री, नगर विकास यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच मा. राज्यमंत्री श्री. शिवाजीराव पंडित यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर ते मंडळाच्या सभेस पहिल्यांदाच हजर झाल्याने त्यांचा परिचय करून देऊन त्यांचे स्वागत करण्यांत आले व मंडळाच्या सभेस सुरुवात करण्यांत आली. सभेच्या कामास सुरुवात होण्यापूर्वी मंडळाचे अध्यक्षांनी या सभेतही मा. मंत्री, (ग्राम विकास) यांची सह अध्यक्ष म्हणून व राज्यमंत्री, (नगर विकास) यांची सहउपाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्याबाबत अद्याप कार्यवाही झेली नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर ही कार्यवाही शासन स्तरावर प्रलंबित असल्याचे मंडळाचे सदस्य सचिवांनी लक्षात आणून दिले.

कार्यक्रम बाब क्र.1 : महा. पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या 63 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या दिनांक 12.8.94 व दिनांक 30.8.94 रोजी झालेल्या 63 व्या सभेचे इतिवृत्त मंडळाच्या सभासदांना मंडळाचे पत्र क्र.मपापुवजनिमं/ 1094 / सभा-63 / अ-4, दिनांक 10 ऑक्टोबर, 1994 द्वारे पाठविण्यांत आले. त्यास कोणत्याही सदस्यांनी सूचना अथवा दुरुस्ती सुचविली नाही असे मंडळाच्या सदस्य सचिवांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणले, त्यानंतर अध्यक्षांनी इतिवृत्तामध्ये काही बदल हवे काय असे सभासदांना विचारले व सभासदांनीही कोणताही आक्षेप न घेता त्यामुळे सदर इतिवृत्तास दुजोरा देण्यांत आला व 63 व्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र.2 : महा. पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या 63 व्या सभेतील बाबीवर करण्यांत आलेली कृती.

सदस्य सचिवांनी 63 व्या सभेतील बाबीवर करण्यांत आलेल्या मंडळाच्या कार्यवाहीबाबत माहिती दिली व केलेल्या कृतीस मान्यता देण्यांत आली. यावर चर्चा करताना त्यातील बाबीवर झालेली चर्चा खालील प्रमाणे.

कार्यक्रम बाब क्र. 23 / 63.

ग्रामीण योजनांचा आढावा या बाबीवर चर्चा करताना मराठवाड्यातील सद्यःस्थिती पहाता ब-याच गावांना अद्यापि योजना पूर्ण होऊनही पाणी नसल्याचे मा. उपाध्यक्षांनी नजरेस आणले. याबाबत मा. अध्यक्षांनी असे आदेश दिले की, या पुढील काळात ट्युब वेल किंवा बोअरवेल यासारखे उद्भव विचारांत घेवून योजना हाती घेण्यांत येवू नयेत.

..3..

२३|५६



कार्यक्रम बाब क्र. 24 / 63.

मंडळातील नगरपालिकेकडील वसुलीबाबत शासन स्तरावर माजी प्रधान सचिव श्री.व्यंकट चारी यांचे प्रमाणे सध्याचे प्रधान सचिव, श्री. राजवाडे यांनीही नगरपालिकेकडील मुख्य अधिका-यांची सभा घेतली व त्यात नगरपालिकेकडील वसुली डिसेंबर पर्यंत होईल असे आश्वासन दिले आहे. सध्याचे प्रधान सचिव यांचा पाठपुरावा करीत आहेत.

कार्यक्रम बाब क्र. 3 : आस्थापना, हत्यारे व संनियंत्रण आकार वाढविणेबाबत ..

आस्थापना, हत्यारे व संनियंत्रण आकार व वाढविण्याबाबतच्या कार्यक्रम बाबीवर दोन वेळा चर्चा करण्यांत आली. मंडळाच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी व मंडळाच्या सदस्यांनी हे आकार वाढविणे आवश्यक असल्याचे वारंवार सांगतले परंतु इ.टी.पी. कमी असल्याने मंडळास तोटा होत असेल तर त्याचा अभ्यास करुन महाराष्ट्रातील लघू पाटबंधारे योजनांचा इ.टी.पी. गुजराथ, कर्नाटक, आंध्र यांच्या इ.टी.पी. चा विचार करुन सविस्तर माहिती घावी. तसेच शासनाच्या ग्रामीण व नागरी योजना वेगळी करण्याच्या धोरणामुळे इ.टी.पी. वाढला आहे. या सर्वच प्रश्नांचा सखोल विचार करुन शिफारशी करण्यासाठी मंडळाच्या सदस्यांचा एक स्वतंत्र अभ्यासगट नेमावा. श्री. अगरवाल, श्री. गोखले हे सदस्य व मंडळाचे अधिकारी श्री. सगणे, श्री. अरमाळ, श्री. संकपाळ, श्री. भसाळे व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी श्री. कुलकर्णी यांचा या कमिटीमध्ये समावेश असावा. कमिटीचा अहवाल मंडळाच्या पुढील सभेपुढे ठेवण्यांत यावा असे ठरले.

कार्यक्रम बाब क्र.4 : मंडळाच्या 64 व्या सभेसमोर ठेवण्यात आलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सद्यःस्थितीचा अहवाल ..

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सद्यःस्थितीचा अहवाल याबाबत मुख्य अभियंता -(ग्रामीण) यांनी माहिती दिली. ज्या अपुर्ण योजना 5 ते 10 वर्षापेक्षा जास्त काळ रेंगाळलेल्या आहेत त्यांच्या विश्लेषणाच्या तक्त्याकडे त्यांनी सभेचे लक्ष वेधले. मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून मा. श्री. शिवाजीराव पंडीत यांनी बीड जिल्हयातील सद्यःस्थिती सांगताना तेथील नळ योजनांची स्थिती खराब असून त्या योजनांसाठी वापरलेले नळ व इतर साहित्य हलक्या प्रतीचे असल्याचे व चालत नसल्याचे सांगून अशा त-हेच्या योजना पूर्ण करुन हस्तांतरीत करणे योग्य नाही असे मत व्यक्त केले, त्यामुळे मंडळाचे नांव खराब होते. मुख्य अभियंता -(ग्रामीण) व सदस्य सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, हस्तांतरणाच्या वेळी योजना चालू स्थितीतच हस्तांतरीत केल्या जातात. मात्र जिल्हापरिषद / ग्रामपंचायती यांच्याकडून त्यांची देखभाल नीट होत नसल्यामुळे त्यांची अशी स्थिती होते यात मंडळाचा काहीही दोष नाही. राज्यमंत्री, ग्राम विकास व मंडळाचे उपाध्यक्ष यांनी बीड जिल्हयातील नळ योजनांचा नुकताच आढावा घेतला असे सांगतले व एकूण 353 योजना बंद असल्याचे सांगतले त्यामध्ये परिसर अभियांत्रिकी मंडळातर्फे राबविण्यांत आलेल्या 90 योजना असून या सर्व योजना बंद असण्याची कारणे तपासावी व योग्य त्या दुरुस्त्या कराव्यात असे सुचविले. त्यावर श्री. गणेश रॉय व इतर सदस्य यांनी सर्व जिल्हयातील बंद असलेल्या योजनांची पहाणी करावी व ती फक्त बीड जिल्हयापुरतीच मर्यादित असू नये असे सुचविले.

मंडळाचे अध्यक्षांनी 1 नोव्हेंबर ते 15 नोव्हेंबर हा पंधरवाडा योजनांचा पहाणी करण्याचा पंधरवाडा म्हणून संपन्न करावा व त्यासाठी जिल्हापरिषदेची मदत घ्यावी, बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचा आढावा घ्यावा व योजना बंद पडण्याची कारणे शोधून काढवीत असे सांगून यासाठी

लागणारा अतिरिक्त निधी ग्राम विकास विभागाने द्यावा. तसेच प्रत्येक जिल्ह्यात अतिरिक्त पंप उपलब्ध ठेवावेत म्हणजे एखादा पंप बिघडला असल्यास तो दुरुस्त होईपर्यंत अतिरिक्त पंपाचा वापर करता येऊ शकेल. योजना ताब्यात घेताना कोणत्या बाबी तपासाव्या याबाबतचे एक विहित फॉर्मेट ग्राम विकास विभागाने तयार करावे. जिल्हापरिषदेने सहकार्य दिले नाहीतर या योजना चालू करणे कठिण जाईल. त्यानंतर खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

ज्या जिल्ह्यात सध्या पाणी टंचाई आहे त्या जिल्ह्यातील सर्व नळ योजनांची पहाणी करण्यांत यावी व ज्या योजनांची दुरुस्ती करून त्या चालू करणे शक्य आहे, त्यांचे अंदाजपत्रक तयार करून शासनाकडे पैशाची मागणी करावी.

कार्यक्रम बाब क्र.5 : पूर्ण झालेल्या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या हस्तांतरणाबाबत ..

सदस्य सचिव यांनी असे सांगितले की, ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊनही जिल्हा परिषद / ग्रामपंचायत त्या चालविण्यासाठी ताब्यांत घेत नाहीत, त्यामुळे अशा योजना मंडळास चालवाव्या लागतात. सदर योजना चालविण्यासाठी मंडळाकडे सध्या असलेला कर्मचारीवृंद, योजना हस्तांतरीत करताना, जिल्हा परिषद / ग्राम पंचायत यांच्याकडे वर्ग करावयाचा आहे. योजना हस्तांतरीत करताना सदर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी किती कर्मचारी लागतील हे संबंधित जिल्हा परिषदेने ठरवावे, असे नुक्तेच शासनाच्या ग्रामीण विकास विभागाने दिनांक 15 सप्टेंबर, 1994 रोजी काढलेल्या निर्णयाद्वारे निर्देशित केलेले आहे. योजना चालविण्यासाठी किती कर्मचारी लागतील ही तांत्रीक बाब असल्यामुळे जिल्हा परिषद / ग्रामपंचायत ती योग्यरित्या ठरवू शकणार नाही. तसेच मंडळाच्या बाकीच्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेऊ शकणार नाही. सचिव - ग्राम विकास यांनी प्रत्येक योजनेवर सध्या कार्यरत असलेला सर्व कर्मचारीवृंदासह योजना ताब्यात घेतल्यास शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांना पगार द्यावा लागेल व हा खर्च जिल्हा परिषद / ग्राम पंचायतीस झेपणार नाही. त्यामुळे कमीत कमी कर्मचारी वर्ग लावावा लागेल असे सांगितले. तेंव्हा सदस्य सचिव यांनी सुचविले की श्री. अशोक बसाक, तत्कालीन सचिव, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तांत्रिक समितीने सुचविल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे कार्य, देखभाल व दुरुस्ती यासाठी मार्गदर्शिका प्रसिध्द केलेली आहे. त्यातील प्रकरण-14 मध्ये योजना चालविण्यासाठी कमीत कमी कर्मचारीवृंद सुचविला आहे. त्याची अंमलबजावणी संबंधित जिल्हा परिषद / ग्रामपंचायती यांनी करावी व त्यानुसार मंडळाकडे सध्या उपलब्ध असलेला कर्मचारीवृंद सामावून घ्यावा.

मा. अध्यक्ष यांनी वरील चर्चेच्या संदर्भात असे आदेश दिले की, नळ योजनांच्या हस्तांतरणाचे वेळी ग्रा.प. /जि.प. यांनी किती कर्मचारी घ्यावे याचा शासनाने वरील अहवालाचे संदर्भात पुनर्विचार करावा.

कार्यक्रम बाब क्र.6 : चिखलदरा येथे मंडळाचे अतिथीगृह बांधणेबाबत..

चिखलदरा येथे मंडळाचे अतिथीगृह बांधणेबाबतचा मंडळाचा प्रस्ताव सध्याची मंडळाची आर्थिक परिस्थती पहाता सध्या घेऊ नये असे ठरले.

कार्यक्रम बाब क्र.7 : महा. पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळातील विभागीय लेखापालांची वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबत ..

याबाबत सदस्य सचिवांनी या प्रस्तावाची आवश्यकता निदर्शनास आणली व महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळातील विभागीय लेखापालांची वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव यापूर्वी शासनाने फेटाळला असला तरी पुन्हा शासनाकडे पाठविण्याचे ठरले.

कार्यक्रम बाब क्र. 8 : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या ठोक किरकोळ स्वरुपात पाणी पुरवठा करण्याबाबतच्या उपविधीमध्ये दुरुस्ती.

मंडळाच्या 63 व्या सभेत कार्यक्रम बाब क्र.7 च्या चर्चेत असे सुचित करण्यांत आलेले होते की, मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी, भाईंदर व नवीन मुंबई संस्थात अनधिकृत नळ जोडण्याबाबत काय कार्यवाही करण्यांत येते याचा आढवा घेऊनच ठराव परत सादर करावा त्यानुसार मुख्य अभियंता -(प्रकल्प) यांनी असे सुचित केले की, ठाणे, महानगरपालिका, ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर नगरपालिकांच्या उपविधीमध्ये याबाबत विशेष तरतूद नाही. भिवंडी नगरपरिषदेमध्ये अशा अनधिकृत नळ जोडण्या आढळल्यास त्या काढून टाकून त्याचा खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यांत येतो. मात्र नळ जोडणीसाठी इमारतीस आवश्यक ती मंजूरी आहे किंवा नाही, मालमत्ता कर आकारणे किंवा नाही हे बंधनकारक नाही.

कल्याण महापालिका क्षेत्रात नळ जोडणीचा प्रश्न असल्याने व पाणी उत्पन्नापासून वंचित व्हावे लागत असल्याने आपला ठराव क्र. 658, दिनांक 29.9.92 च्या ठरावानुसार नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी दुप्पट अनामत रक्कम घेऊन पाणी बिलाची आकारणी पाण्याच्या वापराच्या कारणानुसार ठरविलेल्या दराच्या 2.1/2 पट दराने करावी असे नमूद केलेले आहे. मंडळाचीही अनधिकृत नळ जोडण्या सदर शहराच्या समोवतालीच असल्याने मंडळानेही अशा अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्यास परवानगी देण्याची विनंती मंडळाने मंजूर केली. मात्र सदर उपाय योजना जाहीर केल्यापासून 6 महिने ग्राह्य रहावी व जे ग्राहक त्यांच्या नळ जोडण्या या कालावधित अधिकृत करतील त्यांच्याच नळ जोडण्या अधिकृत करण्यांत याव्यात. नंतर आढळून येणा-या अनधिकृत जोडण्या तोडण्यांत याव्यात.

ठरावास मंडळाने मान्यता दिली व यापुढे तीन वर्षे तरी अनधिकृत नळ जोडणी होणार नाही याची काळजी मंडळ अधिका-यांनी घ्यावी अशी सूचना सदस्य, श्री. गणेश रॉय यांनी केली.

ठराव : या ठरावानुसार महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्याबाबतच्या या सोबतच्या प्रपत्र क्र.1 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वास मान्यता देत आहे. सदर मार्गदर्शक तत्वे त्यांना दिलेल्या प्रसिध्दीपासून सहा महिन्याच्या कालावधीसाठीच अंमलात राहतील.

कार्यक्रम बाब क्र.9 : अहमदनगर मलनि:सारण योजनेतील जलशुध्दीकरण केंद्राच्या संकल्पना बांधकाम करणे मे. हॅड्रोलिक्स अँन्ड जनरल इंजीनिअर कंपनीचे वाढीव एस्केलेशनचे मागणीबाबत..

कार्यक्रम बाब क्र.10 : वाणकोट प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी मे. पटेल कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदाराच्या धरणाच्या कामाच्या कंत्राटातील एस्केलेशन मागणीबाबत ..

अशा एक्सलेशनच्या बाबीबाबत विचार करुन शिफारशी करण्यासाठी मंडळाने एक पाच सदस्यांची उप समिती नेमावी व त्या समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करावी असे ठरविण्यांत आले व यापुढे अशा कार्यक्रम बाबी मंडळापुढे की समितीच्या अहवालासहच आणाव्या. अशा सूचना करुन सदस्य सचिवांना शासकीय नियमांप्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र. 11 : औरंगाबाद शहर वितरण व्यवस्थेची योजना टप्पा-1 1400 मि.ली. उच्च दाबाची व्यासाची प्रिस्ट्रेड कॉंक्रीटची गुरुत्ववाहीनी टकणे. (नक्षत्रवाडी ते रेल्वे स्टेशन) पोलादी तारांच्या किंमतीत वाढ झाल्याने दरातील वाढ मिळणेबाबत ..

याबाबत मा. शिवाजीराव पंडित, उपाध्यक्ष यांनी असे सुचित केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे / तसेच जिल्हा परिषद यांच्या दरापेक्षा मंडळाचे शेडयूल रेट खूपच वाढीव आहेत याचा विचार व्हावा, यावर श्री.जोसेफ, सचिव, नगर विकास यांनी असे सांगितले की, शासनाच्या एक्सक्लेशन नियमांत याची तरतूद नाही, यावर चर्चा होऊन मंडळाने वर उल्लेख केलेल्या 5 जणांच्या समितीच्या अहवालानुसार सदस्य सचिव यांनी पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

टेबल कार्यक्रम बाब क्र.1 : कोकण भवन, नवी मुंबई येथे हलविण्यांत आलेल्या कार्यालयात काम करणा-या शासकीय कर्मचा-यांना विशेष रोख भत्ता.

असा विशेष रोख भत्ता देण्याची शिफारस करावी व त्यासाठी सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यास सदस्य सचिवांना अधिकार देण्यास मंडळाने संमती दिली.

टेबल कार्यक्रम बाब क्र 2 : वार्षिक अहवाल सन 1992-93 वार्षिक प्रशासकीय व लेखा परिक्षण अहवाल मंजूर करण्यांत आला.

टेबल कार्यक्रम बाब क्र.3 : राज्यातील सर्व जिल्हयातील प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेने ताब्यात न घेतल्याने त्याची देखभाल दुरुस्ती बंद करणेबाबत..

सदस्य सचिव यांनी सांगितले की, सध्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळातर्फे एकूण 122 योजना चालविण्यात येतात, त्या चालविण्यासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी दरवर्षी अंदाजे 10.10 कोटी रु. खर्च येतो. हा निधी शासन किंवा जिल्हा परिषद यांच्याकडून मंडळास प्राप्त होत नाही. राज्यातील जिल्हा परिषद व ग्राम पंचायत यांचेकडून विविध येण्यापाई, मंडळास आतापर्यंत एकूण 54.93 कोटी रु. येणे बाकी आहे. शासनाच्या दिनांक 15.9.1994 च्या निर्णयाप्रमाणे अशा योजना हस्तांतरीत करण्याच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. सदर योजना जिल्हा परिषद / ग्राम पंचायत यांना पुरेशी नोटीस देऊन दिनांक 30.11.94 पर्यंत ताब्यात घेतल्या नाहीत, तर 1.12.1994 पासून मंडळामार्फत होणारा पाणी पुरवठा बंद करावा हया बाबीवर सभेत बरीच चर्चा झाली. मा. राज्यमंत्री व मंडळाचे उपाध्यक्ष यांनी या बाबीवर आक्षेप घेतला आणि असे सुचविले की, कोणतीही योजना बंद न करता त्यास लागणारा निधी शासनाने मंडळास किंवा जिल्हापरिषद / ग्राम पंचायत यांना द्यावा. तथापि सर्व सदस्यांनी, ताब्यात न घेतलेल्या योजना मंडळाने चालवू नयेत, असा आग्रह धरला. त्यावर मा. अध्यक्षांनी अशा योजना 31.3.1995 पर्यंत जिल्हा परिषद / ग्रामपंचायत यांनी ताब्यात घेतल्या नाहीत, तर 1.4.1995 पासून मंडळाने योजना चालविण्याचे बंद करावे असे सुचविले.

टेबल कार्यक्रम बाब क्र.4 : श्री.सु.पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी यांना मंडळाचे सेवेत कायमचे सामावून घेण्याबाबत ..

कोणतेही नवीन पद निर्माण न करता असलेल्या पदावर असलेल्या वेतनश्रेणीत श्री. भातखंडे यांना सामावून घेण्यास मंडळाने मंजूरी दिली.

ठराव : असा ठराव करण्यात येतो की, मंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेले श्री. सु.पु. भातखंडे, कामगार अधिकारी यांना मंडळातील कायदा व कामगार अधिकारी या पदावर रु. 2200-3700/- या वेतनश्रेणीत रु. 3000 या प्रारंभिक वेतनावर कायमचे समाविष्ट करण्यास मंडळ मंजूरी देत आहे. या संदर्भात योग्य ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत.

टेबल कार्यक्रम क्र.5 : जागतिक बँक प्रकल्प क्षेत्रातील कार्यालयाचे प्रकल्प क्षेत्राबाहेर स्थलांतर आणि स्थलांतर झालेल्या ठिकाणी त्या कार्यालयाचे अस्तित्व यापुढेही रहाण्याचे समर्थन :

जागतिक बँक प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी जी कार्यालये गरजेनुसार (1149 पदे) उघडण्यांत आली व इतरत्र कार्यभार वाढल्याने स्थलांतरीत करण्यात आली त्या मंडळातील सर्व अस्तित्वातील कार्यालये व पदे यापुढे चालू ठेवण्यास तसेच जी 1149 पदे निर्माण करण्यात आली ती यापुढेही चालू ठेवावीत असा प्रस्ताव मंडळापुढे ठेवण्यांत आला. परंतु सध्याची मंडळाची आर्थिक स्थिती लक्षात घेवून इतक्या पदांची मंडळास आवश्यकता आहे काय यासाठी कामाचा आढावा, आर्थिक बोजा या गोष्टीचा सांगोपांग विचार व्हावा व सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करावा असे ठरविण्यांत आले.

टेबल कार्यक्रम बाब क्र.6 : जादा अर्हता प्राप्त करणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत वयाची अट शिथिल करण्याबाबत ..

सरळ सेवा भरतीने नियुक्तीचे बाबतीत मंडळाच्या सेवेतील, अधिकृत माध्यमाद्वारे नियुक्त झालेल्या व शैक्षणिक अर्हता प्राप्त करणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत सेवाप्रवेश नियमातील वयाची अट लागू असू नये या कार्यक्रम बाबीची चर्चा झाली परंतु शासनाकडे अशी तरतूद नसल्याने बाब अमान्य करण्यात आली.

काही इतर बाबीवर चर्चा करताना श्री. पाटील, सदस्य यांनी अक्कलकोट येथील योजनाबाबत तेथील मशिन / इंजन पाण्यासाठी असल्याने पाणी पुरवठा होत नसल्याचे सांगतले. तसेच ही बाब मंडळाच्या अधिका-याच्या नजरेस आणली असता त्यांनी अनास्था दाखवली अशी तक्रार केली. सदस्य सचिवांनी असे प्रतिपादन केले कि सदरहू योजना ब-याच वर्षापुर्वी हस्तांतरीत केली असल्यामुळे पाणी पुरवठा मंडळाची जबाबदारी रहात नाही. त्यामूळे कुठलीही कार्यवाही ग्राम किंवा जिल्हा परिषदच करु शकतात. परंतू योग्य त्या मार्गदर्शनासाठी मंडळाकडून लक्ष देण्यांत येईल व संबंधित अधिका-यांना सुचना देण्यात येतील. कुठल्या अधिका-याने व्यवस्थीतपणे सांगतले नाही त्याबाबत विचारपूस करण्यात येईल असे सदस्य सचिवांना सांगतले.

मंडळाच्या अध्यक्षांनी सर्व बाबींवर चर्चा झाली असे स्पष्ट करुन उपस्थितांचे आभार मानले व सभा समाप्त झाल्याचे सांगतले.

आ–1.

दिनांक : 18 जानेवारी, 1995.

विषय : दिनांक 10.1.95 ( मंगळवार ) रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 65वी सभा मंगळवार दिनांक 10.1.95 रोजी मा. मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे कार्यइतिवृत्त सोबत मंजूरीस्तव सादर करीत आहे.

मुख्य प्रशासकीय अधिकारी.

सदस्य सचिव.

मा. मंत्री, न.वि. व
मंडळाचे अध्यक्ष.

Anil Govardhan
28/1/95